# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

## दिनांक:30.04.2024 वार:मंगळवार

---

1. देशभरात लोकसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला; विविध पक्षांच्या नेत्यांचे झंझावाती प्रचार दौरे
2. चौथ्या टप्प्यात महाराष्ट्रातल्या 11 मतदार संघांमध्ये 298 उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात
3. कॅनडामध्ये सार्वजनिक कार्यक्रमात खलिस्तानच्या समर्थनार्थ दिलेल्या घोषणांचा भारताकडून तीव्र निषेध
4. राष्ट्रीय पात्रता चाचणी-नेट येत्या 16 जूनऐवजी 18 जूनला होणार आणि
5. देशाच्या विविध भागात उष्णतेची लाट कायम राहण्याचा हवामान विभागाचा अंदाज

**पंतप्रधान सभा**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी 10 राज्ये आणि 2 केंद्रशासित प्रदेशांमधील 95 मतदारसंघांमध्ये 7 मे रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी विविध राजकीय पक्षांचे प्रमुख नेते एकाच दिवसात विविध राज्यांतील अनेक मतदारसंघात अनेक सभा घेत आहेत. महाराष्ट्रातही प्रचाराची रणधुमाळी सुरू असून, विविध राजकीय पक्षांचे नेते झंझावाती दौरे करत प्रचारसभा घेत आहेत. भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल राज्यात सोलापूर, सातारा जिल्ह्यात कराड इथं आणि पुण्यात अशा तीन प्रचार सभा घेतल्या. भाजपाच्या नेतृत्वातल्या राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारनं महागाई आणि भ्रष्टाचार कमी करण्याचा प्रयत्न केला. देशाला स्थिर आणि मजबूत सरकारची गरज आहे. ते आम्हीच देऊ शकतो असं ठाम प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल पुण्यात केलं. पुणे, बारामती, शिरूर आणि मावळ लोकसभा मतदारसंघातल्या महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी घेतलेल्या प्रचारसभेत ते बोलत होते. केंद्र सरकारच्या विविध योजनांची आणि भविष्यातल्या संकल्पांची माहिती त्यांनी दिली. या देशातली कोणतीही व्यक्ति राज्यघटना बदलू शकत नाही तसंच आरक्षणही संपुष्टात आणू शकत नाही असं त्यांनी सोलापुरातल्या प्रचारसभेत सांगितलं. विरोधी पक्ष राज्यघटना आणि आरक्षण याबाबत लोकांमध्ये गैरसमज पसरवत आहेत अशी टीका त्यांनी केली. इतर कोणाच्याही अधिकारांना धक्का न लावता केंद्र सरकारनं गरीबांना 10 टक्के आरक्षण दिलं आहे असंही ते म्हणाले. आज सोलापूर जिल्ह्यात माळशिरस तसंच धाराशिव आणि लातूर इथं मोदी यांची प्रचारसभा होणार आहे.

**पंतप्रधान-मुलाखत**

केंद्र सरकारनं गेल्या दहा वर्षांच्या काळात 25 कोटी लोकांना दारिद्र्यरेषेतून बाहेर काढलं असून, गरिबीला हरवण्याची क्षमता गरीबांमध्ये निर्माण केली आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल एका खासगी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत केलं. आज जगाचा भारतावरील विश्वास वाढला आहे, कारण 140 कोटी देशवासीयांनी स्थिर, मजबूत आणि स्पष्ट बहुमताचं सरकार स्थापन केलं आहे. भारताचं उत्पन्न इतर देशांच्या तुलनेत झपाट्यानं वाढलं असून, या दहा वर्षांच्या काळात महागाई सर्वांत कमी होती, असा दावाही त्यांनी केला. सरकार समाजाच्या कल्याणासाठी काम करत आहे, असंही ते म्हणाले.

**शरद पवार**

सरकार हुकूमशाहीच्या दिशेनं चाललं असून त्याला आत्ताच आवर घालण्याची, लोकशाहीच्या भवितव्यासाठी लढा देण्याची गरज आ हे, असं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी म्हटलं आहे. ते काल बारामती लोकसभा मतदार संघात सासवड इथं महाविकास आघाडीच्या मेळाव्यात बोलत होते. दरम्यान, आज संध्याकाळी पुण्यात महाविकास आघाडीची जाहीर सभा होणार आहे. या सभेला शरद पवार, उद्धव ठाकरे, बाळासाहेब थोरात संबोधित करतील.

**नाना पटोले**

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी काल पुण्यात पक्षाचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या प्रचारासाठी पत्रकार परिषद घेतली. येत्या तीन तारखेला पुण्यात राहुल गांधी यांची सभा होणार आहे. तसंच नंदुरबार आणि पुण्यात काँग्रेसच्या नेत्या प्रियांका गांधी यांच्या रोड शोचं नियोजन करण्यात येणार आहे अशी माहिती त्यांनी दिली.

प्रकाश आंबेडकर

वंचित बहुजन आघाडीसाठी यंदा सकारात्मक वातावरण असून यावेळी आम्ही आमचं लोकसभेतलं खातं नक्की उघडू असा विश्वास वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख ॲडव्होकेट प्रकाश आंबेडकर यांनी काल पुण्यात व्यक्त केला. वंचितचे पुण्यातले उमेदवार वसंत मोरे यांच्या प्रचाराची सुरूवात आंबेडकर यांच्या उपस्थितीत झाली; त्यावेळी ते बोलत होते.

**उध्दव ठाकरे सभा**

सोलापूर लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांच्या प्रचारार्थ शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी काल सोलापूरमध्ये जाहीर सभा घेतली. या सभेत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली. दरम्यान, पंतप्रधान आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी काल कर्नाटकातील बागलकोट इथंही सभा घेतली. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांनी काल गुजरातमधील पाटण आणि छत्तीसगडमधील बिलासपूर शहरात जाहीर सभांना संबोधित केलं. ही लोकसभा निवडणूक केवळ निवडणूक नसून दोन विचारसरणींमधील लढा आहे, असं राहुल गांधी म्हणाले. भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी काल बिहारमधील बेगुसराय आणि मधुबनी इथं दोन सभा घेतल्या. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी यादगीर जिल्ह्यातील गुरुमितकल इथं एका सभेला संबोधित केलं. देशातील महागाई आणि बेरोजगारीमुळे जनतेच्या त्रासाबद्दल त्यांनी भाष्य केले. सरचिटणीस प्रियांका गांधी यांनी देशातील महागाई आणि बेरोजगारीसाठी केंद्र सरकारला जबाबदार धरले. त्यांनी काल कर्नाटकातील गुलबर्गा लोकसभा मतदारसंघातील सेदाम इथं जाहीर सभेला संबोधित केलं.

**निवडणूक सहावा टप्पा**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज मागं घेण्याचा काल शेवटचा दिवस होता. नऊ राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातील 96 जागांसाठी 13 मे तारखेला या टप्प्यात मतदान होणार आहे. या टप्प्यात मतदान होणाऱ्या महाराष्ट्रातल्या 11 मतदार संघांतल्या लढतींचं चित्र आता स्पष्ट झालं आहे. 71 उमेदवारांनी आपली उमेदवारी मागं घेतल्यामुळे आता 298 उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे.

**उमेदवारी अर्ज**

दरम्यान लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात 20 मे रोजी मतदान होणार आहे. यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.महाराष्ट्रात विविध पक्षांच्या उमेदवारांनी शक्तिप्रदर्शन करत आपापले उमेदवारी अर्ज काल दाखल केले.

**निवडणूक आयोग**

पश्चिम बंगालमध्ये निवडणुकीदरम्यान झालेल्या हिंसाचार आणि हिंसेचे खोटे व्हिडिओ प्रसारित केल्याच्या मुद्द्यांवरून काल भाजपच्या एका शिष्टमंडळानं निवडणूक आयोगाची भेट घेतली. तर दुसरीकडे, कॉंग्रेसनही आपल्या जाहीरनाम्याचा भाजपानं चुकीचा उल्लेख केल्याचा दावा करत निवडणूक आयोगाशी संपर्क साधला. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या दोन सदस्यीय शिष्टमंडळानंही काल नवी दिल्लीत निवडणूक आयोगाची भेट घेऊन भाजप नेत्यांच्या विरोधात जातीय तेढ वाढवणं, मतदारांचं ध्रुवीकरण करण्यासाठी वस्तुस्थितीचा विपर्यास करणं अशा विविध तक्रारी नोंदवल्या.

**मणिपूर-पुनर्मतदान**

मणिपूर मधील सहा लोकसभा मतदारसंघात पुन्हामतदान घेण्यासाठी निवडणूक आयोगाणे आवश्यक तीसर्व तयारी केली आहे. मणिपूरमधल्या उर्खुल जिल्ह्यातील पाच आणि सेनापती इथल्या एकामतदान केंद्रावर आज सकाळी 7 ते संध्याकाळी 4 वाजेपर्यंत पुनर्मतदान होत आहे.गेल्या 26 एप्रिल रोजी इथे मतदान झालं होत, मात्र निवडणूक आयोगाने त्यावेळी झालेलीमतदान प्रक्रिया रद्दबातल मानली आणि पुन्हा मतदान घेण्याचे निर्देश दिले.

**भारत-कॅनडा**

कॅनडामध्ये तिथल्या पंतप्रधानांच्या उपस्थितीत झालेल्या एका सार्वजनिक कार्यक्रमात खलिस्तानच्या समर्थनार्थ घोषणा देण्यात आल्याच्या घटनेचा भारतानं तीव्र निषेध नोंदवला आहे. या संदर्भात परराष्ट्र मंत्रालयानं काल नवी दिल्लीतील कॅनडाच्या उपउच्चायुक्तांना बोलावून घेऊन या प्रकाराबददल तीव्र निषेध व्यक्त करत चिंता व्यक्त केली. कॅनडात फुटीरतावाद, अतिरेकी आणि हिंसाचाराला राजकीय पाठबळ मिळत असल्याचं यातून पुन्हा एकदा स्पष्ट होतं असल्याचंही भारतानं म्हटलं आहे. याचा परिणाम केवळ भारत-कॅनडा संबंधांवरच होत नाही तर कॅनडामधील हिंसाचार आणि गुन्हेगारीच्या वातावरणाला प्रोत्साहन मिळत असून, स्वतःच्याच नागरिकांचं नुकसान होत आहे, असंही भारतानं म्हटलं आहे.

**नीट**

विद्यापीठ अनुदान आयोगानं राष्ट्रीय पात्रता चाचणी अर्थात नेट दोन दिवस पुढे ढकलली आहे. आता ही परीक्षा पूर्वनियोजित 16 जूनऐवजी 18 जूनला होणार आहे.

**<u>हवामान</u>**

येत्या काही दिवसात देशात काही ठिकाणी उष्णतेची लाट, काही ठिकाणी पाउस तर काही ठिकाणी बर्फावृष्टीचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. पुढील चार दिवस, तेलंगणा, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि पुद्दुचेरीसह दक्षिणेकडील राज्यांत, उष्णतेची लाट कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. त्याचबरोबर, पश्चिम बंगाल, सिक्कीम आणि गुजरातमध्ये देखिल उद्यापर्यंत उष्णतेची लाट कायम राहणार असून, ओडिशा आणि बिहारमध्ये आज आणि उद्या तीव्र उष्णतेची लाट राहील असा अंदाज हवामान संस्थेने वर्तवला आहे. पुढील पाच दिवसांत अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, नागालँड,मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरामध्ये पाऊस आणि बर्फवृष्टी होईल, असा अंदाज हवामान संस्थेने वर्तवला आहे. तर, आज पंजाब, लक्षद्वीप, केरळ आणि पुद्दुचेरी येथे पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.